अंमली पदार्थ विरोधी शाखा,
पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा
दि.२७/०६/२०१७

## प्रेस नोट

## २६ जून जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिन

२६ जून हा जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिवस पाळण्यात येतो. भंडारा जिल्हा पोलीस दलाचे वतीने २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिवस पाळण्यात आला. अंमली पदार्थाचे दुष्परिणामाबाबात लोकांना जनजागृती व्हावी या करीता अंमली पदार्थ विरोधी शाखा भंडारा चे मार्फतीने भंडारा शहरात बस स्थानक, सामान्य रूग्णालय, सिनेमागृह, शाळा, कॉलेज, गर्दीचे चौकात बॅनर लावून सेवनाचे दुष्परिनामाबाबत जागृती करण्यात आली. गर्दीचे ठिकाणी या अंमली पदार्थाचे सेवनामुळे होणारे आजाराबाबत माहीती देण्यात आली. तसेच शासकिय बसेस च्या मागे पॉम्प्लेट चिटकवून जनजागृती करण्यात आली. संपुर्ण भंडारा जिल्हयात प्रत्येक ठाणे प्रभारी यांनी आपआपले पो.स्टे.हद्दीत अंमली पदार्थाचे सेवनामुळे होणारे दुष्परिणामाचे महत्व पटवून देवून जनजागृती करण्यात आली.

याच दिवसाचे महत्व साधून भंडारा जिल्हयात अंमली पदार्थाचे गुन्हयात जप्त असलेला मुद्देमाल मा. न्यायालयाचे व वरिष्ठांचे आदेशाने पोलीस मुख्यालय परिसरात श्रीमती विनीता शाहू, पोलीस अधिक्षक भंडारा यांचे अध्यक्षतेखाली व कमीटीचे सदस्य मा. रश्मि नांदेडकर, अपर पोलीस अधिक्षक,भंडारा मा. संजय जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी,भंडारा, मा. एम.एम.सिडाम,प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह),मा. सुरेश घुसर,पोलीस निरीक्षक स्थागूशा, गजानन कंकाळे,पोलीस निरीक्षक,पोलीस ठाणे भंडारा,व शासकिय पंचासमक्ष ८६.९४० किलोग्राम गांजा कि.८,६९,९४०/- रू. (आठ लक्ष एकोनसत्तर हजार नऊशे चाळीस रू.) चा माल जाळून नष्ट करण्यात आला.

२६ जून हा जगभर अंमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून पाळण्यात येतो. फक्त एकच दिवस विरोधी दिवस पाळून भागणार नाही तर सदरचा अंमली पदार्थ समुह नष्ट करणे हे काळाची गरज आहे त्याकरीता जनतेने सुध्दा यात सहकार्य करणे गरजेचे आहे. अंमली पदार्थ बाळगणारे, विकणारे, सेवन करणारे लोकांवर नजर ठेवून त्यांना या व्यसनापासून परावृत्त करावे तसेच अशा लोकांची माहीती पोलीसापर्यत पोहचावी जेनेकरून सदर लोकांवर वेळीच कार्यवाही करून आळा घालता येईल व अंमली पदार्थ मुक्त समाजाची निर्मीती होवू शकेल असे आव्हान पोलीस अधिक्षक भंडारा यांचेकडून करण्यात आले आहे.

**संपर्क** -१) नियंत्रण कक्ष फोन क्रं. ०७१८४-२५२४००
२)Whats App क्र.९४०५८३११००,९४०५८४११००

( एम.एम.सिडाम,**पो.नि.** )
प्रभारी,पोलीस उपअधिक्षक (गृह),
पोलीस अधिक्षक कार्या.भंडारा

**प्रति,**
जिल्हा माहीती अधिकारी भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत,** संगणक कक्ष,भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.